आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
७ ऑगस्ट २०२४ - बुधवार

**ठळक बातम्या**

- बांगलादेशाच्या हंगामी प्रधानमंत्रीपदी नोबेल पुरस्कार विजेते मोहम्मद युनुस यांची नियुक्ती
- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून तीन दिवसांच्या न्यूझीलंड दौऱ्यावर
- भारतीय स्टेट बँकेच्या अध्यक्षपदी सी एस शेट्टी यांची नियुक्ती

**आणि**

- वजन अधिक भरल्यानं भारताची पैलवान विनेश फोगाट पॅरीस ऑलिम्पिकमधून अपात्र/ क्रीडामंत्र्यांनी स्पष्टीकरण देण्याची विरोधकांची मागणी

**<><><><><>**

बांगलादेशाचे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद शहाबुद्दीन यांनी तिथली संसद बरखास्त करुन हंगामी सरकारच्या प्रधानमंत्रीपदी नोबेल पुरस्कार विजेते मोहम्मद युनुस यांची नेमणूक केली आहे. लष्कराच्या तिनही दलांचे प्रमुख आणि विद्यार्थी संघटनांच्या शिष्टमंडळासोबत काल झालेल्या बैठकीनंतर त्यांनी हा निर्णय जाहीर केला. मोहम्मद युनुस यांनी ग्रामीण बँकांच्या माध्यमातून गरीबीविरोधी मोहीम राबवल्याबद्दल २००६ मध्ये त्यांना शांततेचा नोबेल पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.

सरकारमधल्या अन्य मंत्र्यांची निवड विविध राजकीय पक्षांशी सल्लामसलत करुन केली जाईल, अशी माहिती राष्ट्रपतींच्या जनसंपर्क सचिवांनी माध्यमांना दिली. दरम्यान बांग्लादेशच्या माजी प्रधानमंत्री खालिदा झिया यांची स्थानबद्धतेतून सुटका करण्यात आली आहे.

लष्कराने सत्तेची सूत्रं हाती घेतल्यानंतर देशातल्या अनेक भागात हिंसाचाराच्या घटना घडल्या. आतापर्यंत झालेल्या हिंसाचारात ४४० जणांचा मृत्यू

झाला आहे. दरम्यान, ढाका इथल्या भारतीय उच्चायुक्तालयातले अत्यावश्यक नसलेले कर्मचारी आणि कुटुंबं भारतात परतले आहेत.

<><><><><>

बांगलादेशातून होणाऱ्या संभाव्य बेकायदेशीर स्थलांतराच्या पार्श्वभूमीवर मणिपूर राज्य सरकारने फेरजॉल आणि जिरिबाम जिल्ह्यात रात्रीच्या वेळी संचारबंदी लागू केली आहे. दोन्ही जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांनी हे आदेश जारी केले. बंदुक, तलवार, काठी, दगड किवा कुठलंही धारदार शस्त्र बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. जिरिबाम जिल्ह्यात जिरिबाम नगरपरिषद आणि बोरोबेका उप विभागाच्या हद्दीत सकाळी ९ ते दुपारी तीन या वेळेत या नियमांमध्ये सूट देण्यात आली आहे.

<><><><><>

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातल्या क्रांतीचा लाभ सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी आयटी क्षेत्र द्वितीय आणि तृतीय श्रेणीतल्या शहरांपर्यंत नेण्याचा सरकारचा मानस असल्याची माहिती, इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान राज्यमंत्री जतिन प्रसाद यांनी दिली आहे. ते आज लोकसभेत पुरवणी प्रश्नांना उत्तर देत होते. सरकारनं देशभरात एकंदर ६५ सॉफ्टवेअर तंत्रज्ञान पार्क केंद्रं उभारली असून त्यापैकी ५७ केंद्र द्वितीय आणि तृतीय श्रेणीतल्या शहरांमध्ये असल्याचंही त्यांनी नमूद केलं. ग्रामीण भागांमध्ये संपर्क जाळं वाढवणं आणि आयटी केंद्र स्थापन करण्यासाठी सरकार आणखी उपक्रम राबवेल, असं त्यांनी सांगितलं. आयटी क्षेत्राने ५४ लाख रोजगार दिले असून त्यापैकी ३७ टक्के कर्मचारी महिला असल्याची बाब त्यांनी अधोरेखित केली.

<><><><><>

देशाची नवीकरणीय ऊर्जा निर्मितीची क्षमता २०३ गिगावॉटपर्यंत पोहोचल्याची माहिती नूतन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आज लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासाला पुरवणी प्रश्नांना उत्तरं देताना दिली. आणखी ११५ गीगावॅट नवीकरणीय ऊर्जा क्षमतेसाठी विविध टप्प्यांवर काम सुरू असल्याचंही त्यांनी सांगितलं. यात हरित हायड्रोजन आणि समुद्रकिनाऱ्यापासून दूर पवनऊर्जा क्षेत्राचीही भर यात पडली असल्याचं जोशी यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

न्यूझीलंडचे गव्हर्नर जनरल डेम सिंडी किरो यांच्या निमंत्रणावरून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज तीन दिवसांच्या न्यूझीलंड दौऱ्यावर जाणार आहेत. या भेटीदरम्यान राष्ट्रपती मुर्मू गव्हर्नर जनरल किरो यांच्यासोबत द्विपक्षीय चर्चा करतील आणि प्रधानमंत्री क्रिस्टोफर लक्सन यांची भेट घेतील. राष्ट्रपती मुर्मू एका शैक्षणिक परिषदेला संबोधित करतील आणि भारतीय समुदाय आणि भारतातल्या मित्रांशी संवाद साधतील. राष्ट्रपती मुर्मू फिजीचा २ दिवसांचा दौरा पूर्ण केल्यानंतर न्यूझीलंडला पोहोचतील. फिजी भेटीदरम्यान, राष्ट्रपतींनी फिजिच्या संसदेला संबोधित केलं. तिथं मुर्मू म्हणाल्या की दक्षिण गोलार्धाची चिंता व्यक्त करण्यासाठी दोन्ही देशांनी एकत्र काम केलं पाहिजे. प्रशांत बेटातल्या राष्ट्राला भेट देणाऱ्या त्या पहिल्या भारतीय राष्ट्रपती ठरल्या. फिजीच्या नेत्यांसोबत द्विपक्षीय बैठका घेण्याबरोबरच, राष्ट्रपती मुर्मू यांनी तिथल्या अनिवासी भारतीयांशी संवाद साधला.

**<><><><><>**

भारतीय स्टेट बँकेच्या अध्यक्षपदी सी एस शेट्टी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती ३ वर्षांसाठी असेल. बँकेच्या सर्वात वरिष्ठ व्यवस्थापकीय संचालक पदावर कार्यरत असलेले शेट्टी २८ ऑगस्टला दिनेश कुमार खारा यांच्याकडून

अध्यक्ष पदाचा कार्यभार स्वीकारतील. कॅबिनेटच्या नियुक्ती मंडळानं शेट्टी यांच्या अध्यक्षपदी नियुक्तीच्या प्रस्तावाला मान्यता दिली आहे.

<><><><><>

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये भारताला मोठा धक्का बसला आहे. भारताची पैलवान विनेश फोगाट हिला ऑलिम्पिकमधून अपात्र ठरवण्यात आलं आहे. अंतिम फेरीच्या आधी तिचं वजन काही ग्रॅमनं अधिक भरल्याने तिच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. त्यामुळं विनेशला अंतिम फेरीचा सामना खेळता येणार नाही आणि तिला पदकही दिलं जाणार नाही. कालच विनेश फोगाट ऑलिम्पिकमध्ये अंतिम फेरीत धडक मारणारी पहिली भारतीय महिला पैलवान ठरली होती. तिनं ५० किलो वजनी गटात क्युबाच्या युस्नेलिस गुझमान लोपेझ हिच्यावर ५-० अशी मात करून अंतिम फेरीत प्रवेश केला होता. तिचा अंतिम सामना आज रात्री अमेरिकेच्या सारा ॲन हिल्डरब्रान्ड्ट हिच्याशी होणार होता. दरम्यान, पैलवान विनेश फोगाटला पॅरिस ऑलिम्पिकमध्ये अपात्र ठरवल्याच्या मुद्द्यावरून विरोधकांनी आज लोकसभेत सरकारवर टीकास्त्र सोडलं. क्रीडामंत्र्यांनी याबाबत उत्तर द्यावं, अशी मागणी त्यांनी लावून धरली. यावर क्रीडामंत्री दुपारी तीन वाजता लोकसभेत उत्तर देणार आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या प्रकरणी भारतीय ऑलिम्पिक समितीच्या अध्यक्ष पी. टी. उषा यांच्याशी संपर्क साधला. अशा परिस्थितीत भारतासमोर काय पर्याय उपलब्ध आहेत, याबाबत त्यांच्याशी त्यांनी चर्चा केली.

<><><><><>

मात्र, ३००० मीटर स्टीपलचेज स्पर्धेच्या अंतिम फेरीत महाराष्ट्राच्या अविनाश साबळेकडून पदकाची अपेक्षा कायम आहे. पुरुष हॉकीच्या उपांत्य फेरीत भारताच्या संघाला जर्मनीनं ३-२ असं पराभूत केल्यामुळे सुवर्ण किंवा रौप्यपदकाचं

त्यांचं स्वप्न भंगलं. आता रौप्यपदकासाठी त्यांचा सामना उद्या स्पेनशी होणार आहे.

याशिवाय, टेबल टेनिसमध्ये भारतासाठी आजचा दिवस महत्त्वाचा आहे. सांघिक स्पर्धेत मनिका बत्रा, श्रीजा अकुला आणि अर्चना कामत उपांत्य फेरीत प्रवेश मिळवण्यासाठी जर्मनीविरुद्ध लढत देतील. २०२० च्या टोक्यो ऑलिम्पिकमध्ये कास्यपदक जिंकणारी भारोत्तोलक मीराबाई चानू सलग दुसऱ्यांदा पदक जिंकण्याचं ध्येय ठेवून मैदानात उतरेल.

मॅरेथॉन रेस वॉक रिले मिश्र प्रकारात सूरज पन्वर आणि प्रियांका चौधरी महिलांच्या एकेरी स्ट्रोक प्ले स्पर्धेत अदिती अशोक आणि दीक्षा मैदानात उतरतील. अडथळ्यांच्या शर्यतीत ज्योती याराजी, उंच उडीत सर्वेश कुशारे, तर तिहेरी उडीत अब्दुल्ला नारंगोलिंतेविडा आणि प्रवीण चित्रवेल पहिल्या फेरीत खेळतील.

दरम्यान, या स्पर्धेत दोन पदकांची कमाई करणारी नेमबाज मनू भाकर आज भारतात परतली. नवी दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर युवा कल्याण आणि क्रीडा मंत्रालयाचे अधिकारी आणि चाहत्यांनी तिचं उत्साहाने स्वागत केलं.

<><><><>

भारतीय रिझर्व्ह बँकेनं कृषी कर्ज, पशुपालन, दुग्ध व्यवसाय, मत्स्य पालन, मधुमक्षिका पालन यासह संबंधित व्यवसायांसाठी कमी व्याजदरात अल्पावधीसाठी कर्ज उपलब्ध करून देण्याच्या सूचना बँकांना दिल्या आहेत. शेतकऱ्यांना ७ टक्के व्याजदरानं ३ लाख रुपयांपर्यंतचं कर्ज दिलं जाईल. कर्ज देणाऱ्या संस्थांना २०२४-२५ या वर्षासाठी व्याजात दीड टक्क्यांची सूट दिली जाणार असल्याचं आरबीआयनं एका पत्रकात म्हटलं आहे. विहित मुदतीत कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना व्याजात अतिरिक्त ३ टक्क्यांची सूट दिली जाणार असल्याचं तसंच अल्प मुदतीचं कर्ज मिळवण्यासाठी आधार क्रमांक आवश्यक असल्याचं आरबीआयनं म्हटलं आहे.

<><><><>

भारतीय शेअर बाजारात कालच्या पडझडी नंतर आज सकाळच्या सत्रात वाढ पहायला मिळाली. सकाळी मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्समध्ये ९७३ अंकाची वाढ झाली आणि तो ७९ हजार ५६६ अंकांवर पोहोचला. नंतर दुपारी ५८५ अंकांनी घसरुन ७९ हजारावर पोहोचला. राष्ट्रीय शेअर बाजाराच्या निफ्टीहीतही सकाळच्या सत्रात २२१ अंकांची वाढ होऊन तो २४ हजार २१३ वर पोहोचला आहे.

<><><><>

देशभरात आज दहावा राष्ट्रीय हातमाग दिन साजरा केला जात आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी यानिमित्त देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. हातमागाच्या समृद्ध परंपरेचा आपल्याला अभिमान असल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी आपल्या समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे.

<><><><>

भारत आणि यजमान श्रीलंका यांच्यातला तिसरा आणि शेवटचा एकदिवसीय क्रिकेट सामना आज कोलंबोच्या आर. प्रेमदासा स्टेडियमवर होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार दुपारी अडीच वाजता सामन्याला सुरुवात होईल

**<><><><><>**

हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंड मध्ये येत्या ४ दिवसांत मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेशाचा पश्चिम भाग, मध्य प्रदेशाचा पूर्व भाग आणि उत्तराखण्ड मध्ये आज मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.  येत्या दोन तीन दिवसांत जम्मू कश्मीर, उत्तर प्रदेशाचा पूर्व भाग, पूर्व राजस्थान, पंजाब, हरियाणा, चंदीगडमध्ये जोरदार पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं कळवलं आहे.